World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2018; 4(7): 145-147
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती धर्माचे ऐतिहासिकदृष्ट्या टिकात्मक परीक्षण''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
Not Christianity? Before understanding this, it is necessary to understand what Christianity is. Constantine was the first to do so in 329 by the task of converting Christianity to Christianity. He converted theocracy to Christianity. Consequently, the gospel of the last three centuries has been abolished, and Christ is wrapped up in the religion of education. Satan and the kingdom of God. Christianity was recognized as a religion until the fifth century AD. The teachings of Christ were wrapped in the shackles of the state system. St. Augustine tried to leave the same grandson with his reformist teachings. The result was a spark of reform during the pre-medieval period.

**Keywords:** Christianity, Religion, Christ Teachings, Jesus Christ, Christian, Reformation, Augustine, Denominations

**प्रस्तावना**
ख्रिस्ती धर्म नाही ? हे समजण्याअगोदर ख्रिस्ती धर्म म्हणजे काय, हे समजून घेणे अगत्याचे आहे. ख्रिस्ती धर्मतत्वाना ख्रिस्ती धर्मात गोवण्याचे कार्य इ.स. ३२९ मध्ये कॉन्स्टनटाईन याने सर्वप्रथम केला. धर्मसत्तेला राज्यसत्तेत गोवून ख्रिस्त धर्माला राजाश्रय दिला. त्यामुळे गेली तीन शतके सुवार्तेवर चालणारी जीवनशैली एकदम लुप्त झाली आणि ख्रिस्ताला शिक्षणाच्या धर्मात गुंडाळण्यात आले. तेव्हापासून म्हणजे ६०६ ते १५३६ या हजार वर्षाच्या काळात येशू ख्रिस्ताच्या शिक्षणाला धर्माच्या चाकोरीत बांधून ठेवण्यात आले. मार्टिन ल्युथर याने धर्मसुधारणा घडवून आणली. ख्रिस्ताच्या सुवार्ता शिक्षणाला आणि पवित्रशास्त्राला धर्माच्या चाकोरीतून बाहेर काढण्याचा साहसी प्रयत्न केला आणि त्यात त्याला यश आले. संपूर्ण युरोप या धर्मसुधारणेखाली ढवळून निघाले. धर्म सुधारणांचा परिणाम काही काळ चांगला राहिला पण प्रोटेस्टण्ट आणि कॅथलिक या पंथाबरोबरच अनेक पंथ-उपपंथांची निर्मिती झाली. इंग्लंड, अमेरिकेबरोबर अनेक देशांनी ख्रिस्ती धर्माला पुन्हा राजाश्रय दिला. त्यामुळे धर्माचे स्वरूप टिकून राहिले. आधुनिक मंडळीच्या इतिहासात ख्रिस्ती धर्मतत्वे वेगवेगळ्या ख्रिस्ती पंथीय आणि अपंथिय संप्रदायामध्ये प्रदर्शित होताना दिसत आहे आणि त्यातही वेगळेपण आहे. ख्रिस्ती मिशनरीनी जगाच्या वेगवेगळ्या देशात जाऊन ख्रिस्ताचा प्रचार केला. ज्या लोकांनी येशू ख्रिस्ताचा स्वीकार केला, तेथे मंडळींची स्थापना केली. आज ज्या देशात ख्रिस्ती धर्मतत्वे मुळावलेली आहे, ती धर्म म्हणून भारतात ख्रिस्ती धर्माला परकीय धर्म अथवा अब्राह्मनिक धर्म म्हटले जाते. याचे कारण भारतातील जटील जातीव्यवस्था आणि समाजव्यवस्था ज्या चाकोरीतून निघायला लोकांना खूपच अवघड होते. तरी त्यात ना.वा.टिळक, पंडिता रमाबाई, बाबा पदमनजी इत्यादी मंडळीनी तो साहस केला. ना.वा.टिळकांनी तर धर्मांतरण म्हणजे देशांतरण नव्हे हा लेख लिहून प्रतिउत्तर दिले.
प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती भारताचा नागरिक म्हणून जेव्हा आपले हक्क बजावीत असतो. तेव्हा धर्म हा दुय्यम आणि संविधान प्रथम असतो. जेव्हा मी धर्मनिरपेक्ष म्हणून माझे अधिकार बजावितो, तेव्हा मी भारताचा नागरिकच असतो. मी हे सांगू शकत नाही, मी ख्रिस्ताचा अनुयायी म्हणून माझे अधिकार वापरतो. धर्माची बाजू आणि भारताचा नागरिक या दोन्ही गोष्टी वेगळ्या असल्या तरी प्रत्येक भारतीय नागरिकाला संविधानाने धर्मप्रचार करण्याचा अधिकार दिलेला आहे आणि या मौलिक अधिकारात एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून तुम्ही ख्रिस्ताचे सर्वोच्च तत्वज्ञान प्रचारित करू शकतात. त्यात ख्रिस्ती हा धर्म नाही, यांचा दिंडोरा अवाजवी स्वरूपात वाजविण्यात काही अर्थ नाही. जेव्हा आपण पवित्रशास्त्रात पाहतो कि, सर्वप्रथम ख्रिस्ताच्या अनुयायांना ख्रिस्ती का म्हटले गेले, तेव्हा धर्म आणि जीवनशैली यांचा फरक आपल्याला दिसून येतो. इ.सणाच्या पहिल्याशतकात इस्त्राएल हे राष्ट्र म्हणजे रोमन सत्तेच्या

अधिनस्थ होते. विल्यम मक्डोनाल्ड म्हणतात, "मंडळीच्या प्रचारात अत्युखियात ख्रिस्ती धर्माची सुरुवात हे महत्वाचे पाऊल आहे. अत्युखिया हे सिरीयामध्ये ओरेटो नदीच्या किनारी आहे. रोमी साम्राज्यातील ते महत्वाचे तिसरे शहर मानले जात होते. अत्युखियात शिष्यांना खिस्ती हे नाव प्रथम मिळाले."[१] आणि ख्रिस्ताने दिलेला महान आदेश आणि त्याची जीवनशैली परराष्ट्रीय लोकांना त्यांच्या अंगी दिसली म्हणून लोकांनी ख्रिस्ताच्या अनुयायांना ख्रिस्ती म्हणून संबोधले. म्हणजे ज्याप्रमाणे ग्रीक-रोमन धर्म जसा एका विशिष्ठ विचार आणि धर्मांतरावर आधारित आहे. तसेच ख्रिस्ताचे अनुयायी येशू ख्रिस्ताच्या शिक्षणावर आधारित जीवन जगणारे शिष्य आहे आणि आपण पुढे पाहतो. ख्रिस्ती अनुयायांचा जो पुढे मंडळीत विलीन होऊन ख्रिस्ती धर्मात स्थिर झाला. सम्राट कॉन्स्टन्टीनोपल याने प्रत्येक शहरात एक आराधानालय तयार केले आणि तेथे एका प्रिस्टची नेमणूक केली. म्हणून ख्रिस्ती धर्मतत्वे हे आध्यात्मिकदृष्ट्या आत्मिक जीवनाचे केंद्रबिंदू आहे. त्यात ख्रिस्ताचे शिक्षण आणि पवित्रशास्त्र आध्यात्मिक जीवनशैली जगण्याची आणि प्रचार करण्याचे आव्हान करते. तसेच कोणत्याही देशात संविधान आणि शासन हक्कांच्या माध्यमातून धर्म म्हणून हि धर्मतत्वे आणि शिक्षण प्रचारात आणता येतात. आज जवळजवळ जगातील बहुतांश देशात सर्व धर्मांना समान हक्क देण्यात आलेले आहे. ख्रिस्ती हा धर्म नाही ? अथवा आहे ? हा सर्वस्वी ख्रिस्ताच्या धर्ममूल्यावर आधारलेला प्रश्न नाही. त्यामुळे त्यात गल्लत करू नये. येशू ख्रिस्ताने धर्म स्थापण्याचे कार्य कधीहि केलेले नाही. दोन हजार वीस वर्षांनी येशू ख्रिस्ताचा आध्यात्मिक मुल्यांवर कोणीही प्रहार करू शकले नाही. तरी ऐतिहासिक आणि राजकीयदृष्ट्या त्यात भरपूर बदल झालेले आहे. नाही तर ख्रिस्ती धर्मात आज तीन-साडेतीन हजाराच्या आसपास ख्रिस्ती संप्रदाय निर्माण झाले नसते. धर्माचा दृष्टीकोन सांप्रदायिक आणि राजकीय आहे. आपण कोणत्या दृष्टीने त्याचे स्पष्टीकरण करतात यावर ख्रिस्ती धर्म आहे अथवा नाही यांचे उत्तर अवलंबून आहे. सेंट ऑगस्टीन म्हणतात, "पृथ्वीवर स्वर्गाचे प्रतिबिंब म्हणजे चर्च"[२] देवाचे आध्यात्मिक राज्य चालविण्याचे ठिकाण म्हणजे चर्च. पण हे चर्च पृथ्वीवर म्हणजे इहलोकी आहे. पण त्याचा मुख्य आराखडा परलोकी म्हणजे स्वर्गात आहे. ख्रिस्ती धर्म हा धर्म आहे कि नाही? याचे उत्तर जेव्हा तुम्ही अध्यात्मिक भक्तीत रममाण होतात आणि नंतर भौगोलिक जमिनीवर राहून लोकांना ख्रिस्ताचा प्रचार करतात. तेव्हा धर्माचा भेद समजण्यास मदत होते. त्यामुळे सेंट ऑगस्टीन या ख्रिस्ती इतिहासकाराने The City of God हे पुस्तक लिहिले. त्यात सैतानाचे राज्य आणि देवाचे राज्य यावर सर्वोत्तम भाष्य केलेले आहे. इ.सनाच्या पाचव्या शतकापर्यंत ख्रिस्ती धर्म हा धर्म म्हणून मान्य पावला होता. ख्रिस्ताचे शिक्षण हे राज्यव्यवस्थेच्या बंधनात आणि पोतीत गुंडाळलेले होते. त्याच पोतीला सेंट ऑगस्टीनने आपल्या सुधारणावादी शिक्षणाने सोडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. त्याचा परिणाम पूर्वमध्ययुगीन काळात धर्मसुधारणेची ठिणगी पडली.

सी.एम.लुईस म्हणतात, "Christian were an interdenominational ministry and we strive to remain faithful to the spirit"[३] ख्रिस्ती धर्मात वेगवेगळे पंथ-उपपंथ असले तरी ते येशू ख्रिस्त आम्हामध्ये एक आहे आणि एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून आम्ही त्यात विश्वासू राहण्याचा परिपूर्ण प्रयत्न करतो. सी.एस.लुईस यांची ख्रिस्ती असल्याबद्दलची व्याख्या हि सर्व ख्रिस्ती समाजाला जोडणारी आहे आणि त्यासाठी त्यांनी आत्मा आणि शिक्षण यांचे माध्यम घेतले जेणेकरून त्यात काही भेद नसावा.

युरोपात मध्ययुगीन कालखंडात ख्रिस्ती धर्माला धर्म म्हणून राजाश्रय मिळाला तेव्हा त्यांची धर्ममुल्ये तुडविली गेली आणि त्यामुळे हजार वर्षात अनेक वाईट घटना घडल्या. ख्रिस्ती धर्मात मूर्तीपूजेचा शिरकाव झाला. आठ धर्मयुद्धे म्हणजे क्रुसेड घडून आली. मठ आणि सन्यासी जीवनाचा उदय झाला. ख्रिस्ती धर्मतत्वांच्याद्वारे आधुनिक काळात अनेक राष्ट्रे ख्रिस्ती आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्मतत्वाना धर्माचे स्वरूप आलेले आहे आणि त्यात तो चांगल्या पद्धतीने वावरत आहे. उदा.इंग्लंड, भारतात ख्रिस्ती धर्म अल्पसंख्यांक म्हणून वावरत असताना अनेक हक्क त्याला मिळालेले आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्म म्हणून राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या तो थोड्याफार प्रमाणात आपले कार्य करीत आहे. त्यामुळे खिस्ती धर्म नाही, या उक्तीला मोठ्या प्रमाणात प्रतीसाद देवून त्याला आध्यात्मिक स्वरूप देण्याचा जबर प्रयत्न करणे अगत्याचे आहे का ? असा प्रश्न उद्भवतो. .

"फुल गॉस्पेल चर्च ऑफ गॉड या चार हजारपेक्षा जास्त अनुयायी असलेल्या व भगवान येशू ख्रिस्तावर श्रद्धा असलेल्या समुदायाचा याचिकाकर्ता देखील एक अनुयायी असतो. मात्र सदरील समुदायाची भगवान येशू ख्रिस्तावर श्रद्धा असली तरी ख्रिश्चन किंवा इतर कुठल्याही धर्माला सदरील समुदाय मानत नाही, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे होते. याचिकाकर्त्याने असेही नमूद केले की, पवित्र ग्रंथ असलेल्या बायबलमध्ये देखील धर्म या संकल्पनेबाबत कुठलाही उल्लेख नाही व भगवान येशूने देखील स्वर्गासारख्याच राज्याची संकल्पना केलेली असून त्या राज्यातही धर्माला स्थान नाही. या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्याने राज्य सरकारकडे तो ख्रिश्चन नसून कुठल्याही धर्माचा नाही, असा ठराव गॅझेटमध्ये करून मिळावा याकरिता अर्ज केला. मात्र हा अर्ज फेटाळताना राज्य सरकारतर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, मी कुठल्याही धर्माचा नाही, असे प्रतिपादन एखाद्या व्यक्तीला करता येणार नाही. कुठलाच धर्म मानत नाही, असा वेगळा धर्मप्रकार सरकारदरबारी अस्तित्वात नाही. म्हणून राज्य सरकारतर्फे याचिकाकर्त्याचा अर्ज फेटाळण्यात आला. हायकोर्टाने हा निकाल देताना, प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीप्रमाणे वर्तन करण्याचे (Freedom of Conscience) तसेच मोकळेपणाने कुठलेही धर्माचरण अधिकार व स्वातंत्र्य हे घटनेच्या कलम २४ अन्वये सर्वांना आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती तिच्या सदसद्विवेकबुद्धीला पटल्यास धर्माला सोडचिट्ठी देऊन धर्म या संकल्पनेवरच माझा विश्वास नसल्यामुळे मी कुठल्याही धर्माला मानत नाही, असे जाहीरपणे सांगू शकते. थोडक्यात कोर्टाने धर्म या संकल्पनेलाच न मानणाऱ्या समाजातील घटकांना दिलासा दिला आहे. एखाद्या व्यक्तीने स्वतःला निधर्मी असे घोषित करून घेतले तर त्या व्यक्तीस संबंधित कायद्यान्वये मिळणारे हक्क मिळणार का ? असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो."[४]

संविधान कलम २५ प्रमाणे तुम्हाला हे सांगण्याचा अधिकार आहे की, तुम्ही कोणत्याच धर्माचे नाही. पण धर्मनिरपेक्ष आणि अल्पसंख्याक म्हणून शासनाने तुम्हाला दिलेले हक्क आणि सुविधा यांचा वापर करीत असताना तुम्ही स्वतःला निधर्मी म्हणू शकत नाही. ख्रिस्ती धर्म असो की इतर धर्म त्यांना धर्माचा एक समुदाय म्हणून नाहीतर देशाचे नागरिक म्हणून संविधानिक हक्क मिळालेले आहे आणि हे हक्क वापरत असतांना धर्माची मूल्य तर जपावी लागतील पण संविधानाचे हनन होणार नाही याची देखील काळजी घ्यावी लागते.

**संदर्भसूची:-**

1. विश्वासनाऱ्यासाठी पवित्रशास्त्र टीकासंग्रह, विल्यम मकडोनाल्ड, जी.एस.बुक्स, प्रथमावृत्ती, २०१७, पृ.क्र. ३९६.
2. इतिहासलेखनशास्त्र, श्रीनिवास सातभाई, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११.
3. www.focusonthefamily.com Date 16/11/2017, Time 12.44 PM
4. धर्मांतर म्हणजे सर्वधर्मत्याग, महाराष्ट्र टाईम्स, ०८ जून २०१६, वेळ सकाळी ३.५८ www.maharshtratimes.com